# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मुरलीधर बंकट महाडिक,<br>मु. पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मुरलीधर बंकट महाडिक, मु. पो. शेगांव, ता. जत यांनी नवीन घरगुती वीज कनेक्शनसाठी अर्ज केलेला आहे. सदर अर्जासोबत मिळणारे कोटेशन विहित मुदतीत दिले नाही म्हणून कोटेशन मिळावे, वीज कनेक्शन मिळावे व कोटेशनच्या विलंबापोटी नुकसान भरपाई मिळावी अशा मागण्या दि. ४.२.२०१० च्या अर्जाने अंतर्गत कक्षात नोंदविल्या आहेत. कक्षाने दिलेला निर्णय मान्य न झालेने ग्राहकाने ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे धाव घेतल्याचे दिसून येते.

सदर ग्राहकाने दि. १८.३.२०१० रोजी आर.पी.ए.डी.ने मंचात अर्ज दाखल केला आहे. अर्ज दाखल करुन घेवून मंचाने वि.प.कडून अभिप्राय मागविला व दि. ३.५.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी तक्रारादार गैंरहजर होते तथापि वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

ग्राकाने दाखल केलला अर्ज, सोबत जोडलेली कागदपत्रे, वि.प.चा मुद्देनिहाय अहवाल, अंतर्गत कक्षाचा निर्णय, सुनावणी दरम्यानची वि.प.ची कथने या सर्व बाबींचा एकत्रित विचार करतां मंच खालील निष्कर्षाप्रत आलेला आहे.

सदर ग्राहकाने रु. २५/– इतकी रक्कम भरुन दि. ३०.११.२००९ रोजी वि.प.कडे ' अ ' नमुन्यात घरगुती वीज जोडणीसाठी रितसर अर्ज केलेला आहे. अर्ज केल्यानंतर विनियमातील तरतुदीनुसार जागेची पाहणी करुन तसा तांत्रिक अहवाल तयार करुन ग्राहकाने करावयाच्या खर्चाचे चलन अर्ज केलेल्या तारखेपासून ग्रामीण क्षेत्रात २० दिवसांत देणे आवश्यक आहे. तसेच वितरण मेन्सचा विस्तार असल्यास ३० दिवसांची मुदत विनियमात दिलेली आहे. सदर बाबतीत सुनावणीच्यावेळी वि.प.ने कथन केल्याप्रमाणे ३ पोलचे काम करावयास लागणार आहे असे नमूद केले, तथापि त्यासाठी आवश्यक ते तांत्रिक अहवाल किंवा इतर बाबींची पूर्तता वि.प.ने केलेली नाही.

वरील वितरण मेन्सचा विस्तार आहे असे वि.प.च्या कथनावरुन गृहीत धरुन ३० दिवसांचे मुदतीत ग्राहकाने करावयाचे खर्चासंबंधीचे चलन वि.प.कडून ग्राहकास मिळणे उचित होते. याचाच अर्थ दिनांक ३०.११.२००९ पासून मुदतीची कालगणना केल्यास दि. ३०.१२.२००९ पर्यंत चलन मिळणे अपेक्षित होते. सदरचे चलन दि. १९.४.२०१० रोजी देण्यात आलेले आहे. त्याची माहिती वि.प.नेच मंचास दिली आहे. त्यामुळे दि. ३०.१२.२००९ ते दि. १९.४.२०१० या कालावधीसाठी तरतुदीप्रमाणे विलंब भरपाई देणे आवश्यक आहे काय ? याची मंचाने पडताळणी केली असतां, तशी भरपाई रक्कम देणे उचित असल्याचे मंचाचे मत झाले आहे. सदर ग्राहकाने दिलेले चलन दि. २४.४.२०१० रोजी भरलेले आहे हेही वि.प. ने आपल्या कथनात स्पष्ट केलेले आहे. तसेच ग्राहकाकडून चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावर विनियमातील तरतुदीनुसार सत्वर जोडणी देण्यात येईल हेही नमूद केले आहे. या आधारे वितरण वहिनीचा विस्तार गृहीत धरुन चाचणी अहवाल दिल्याच्या तारखेनंतर ३ महिन्यापर्यंत वीज कनेक्शन देणे ही वि.प.ची जबाबदारी राहील याचीही कल्पना वि.प.स देण्यात आलेली आहे, वि.प.ने त्यास सहमती दर्शविली आहे. त्यामुळे ग्राहकाने चाचणी अहवाल दिल्यानंतर ३ महिने मुदतीपर्यंत वाहिनी विस्ताराचे काम पूर्ण करुन वीज जोडणी देण्यात यावी व तसा अहवाल मंचास पाठवावा असे मंच आदेशान्वये पारित करीत आहे. सबब १६ आठवड्यांच्या विलंबासाठी रु. १००/– विलंबाच्या प्रति आठवड्यास किंवा त्याच्या भागास याप्रमाणे रु. १६००/– इतकी विलंब भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी असे मंचाचे ठाम मत झाले आहे.

## आदेश

१) वर विवेचन केल्याप्रमाणे १६ आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १६००/– इतकी भरपाई वि.प.ने ग्राहकास अदा करावी.

२) तसेच वर नमूद केल्याप्रमाणे चाचणी अहवाल दिल्याच्या तारखेपासून ३ महिन्याचे आंत वाहिनी विस्ताराचे काम पूर्ण करुन वीज जोडणी देण्यात यावी.

३) वीज जोडणी झाल्यानंतर ग्राहकास देण्यात येणाऱ्या सलग दोन बिलामध्ये सदर रकमेचे समायोजन करावे व बाकी रक्कम शिल्लक राहिल्यास उर्वरित रक्कम चेकने अदा करावी.

४) सदर प्रकरणी चाचणी अहवाल सादर करुन वीज जोडणी दिल्यानंतरच सदरची भरपाईची रक्कम देण्याची असल्याने वीज जोडणीचा अहवाल व त्यानंतर समायोजन केल्याचा अहवाल असे एकत्रित अंमलबजावणीचे अहवाल देण्यात यावेत त्यांस विनियमातील तरतुदीची बाधा येणार नाही.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :